# प्रकरण तिसरे

## ''ज्याचा त्याचा क्रूस'' आणि ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील कथांचा आशय, विषयाच्या अंगाने अभ्यास.

# प्रकरण तिसरे

# ''ज्याचा त्याचा क्रूस'' व ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील कथांचा आशय, विषयाच्या अंगाने अभ्यास.

**प्रास्ताविक-**

साठोत्तरी कालखंडातील सन १९७० नंतरच्या कथा वाङ्:मयातील एक महत्वाचे कथाकार म्हणून वसंत नरहर फेणे यांना ओळखले जाते. ते गेल्या ३० ते ३५ वर्षापासून कथा लिहित आहेत. ते आपल्या कथामधील आशय, विषयामधून माणसांच्या संबंधाचा खोलवर जाऊन शोध घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांचे कथालेखन खूप विस्तृत व समृद्ध आहे. त्यांच्या ''ज्याचा त्याचा क्रूस'' व ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील कथांचा आशय विषयाच्या अंगाने अभ्यास करणे आवश्यक आहे.

**मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनातील ताणतणावाचे चित्रण करणारा ''ज्याचा त्याचा क्रूस'' हा कथासंग्रह.**

''ज्यांचा त्याचा क्रूस'' हा वसंत नरहर फेणे यांचा सन १९९५ रोजी श्री अशोक कोठावळे यांनी प्रकाशित केलेला कथासंग्रह आहे. ह्या कथा सन १९८९ ते सन १९९५ मध्ये अनुराधा, मराठवाडा, केसरी, प्रतिष्ठान, सावाना या दिवाळी अंकामधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. या कथासंग्रहात एकूण सात कथा समाविष्ट आहेत. या सातही कथा वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरच्या आहेत.

या कथासंग्रहातून वसंत फेणे यांनी जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या राजकीय ताणतणावांचा तेथील जीवनावर होणाऱ्या परिणामांचा वेध आपल्या कथांमध्ये घेतलेला आढळतो. त्याचबरोबर त्यांनी देशांतर्गत, परदेशातून राजकीय वातावरणाचे चित्रमय रेखाकंन करुन या कथासंग्रहात जी माणसं रंगविली आहेत ती वेगळ्या धाटणीची आहेत. राजकीय

ताणतणाव आणि राजकीय प्रवाहात झोकून दिलेल्या माणसांच्या व्यथा-यातना मार्मिकपणे त्यांनी व्यक्त केल्या आहेत. त्याचबरोबर त्यांनी वृद्धांच्या एकटेपणाची भावना आपल्या कथांतून प्रभावीपणे मांडली आहे.

त्यांच्या ''ज्यांचा त्याचा क्रूस'' या कथासंग्रहातील क्रमवार कथांचा आशय, विषय पुढीलप्रमाणे.

**'करविता धनी' -**

ही सन १९८९ रोजी 'अनुराधा' या दिवाळी अंकामध्ये पहिल्यांदा प्रकाशित झालेली कथा आहे.या कथेतील नायिका 'रहिमतबी' ही दारिद्र्याला कंटाळलेली असते. तेंव्हा ती एका तेलगिरणीत नोकरीस लागते. तिथे तिचे गिरणीमालक धर्माप्पाशी सूत जुळते. त्यामुळे ती गर्भार राहते. तेंव्हा तिची निर्माण झालेली संभ्रमावस्था व गिरणीमालकाचा मृत्यू होताच तिला झालेले दु:ख यांचे चित्रण या कथेत वसंत फेणे यांनी केले आहे.

'करविता धनी' या कथेतील रहिमतबी ही नायिका मुस्लिम कुलशीलवान घराण्यातील स्त्री. ती खुशरुबरोबर संसार करीत असताना गरीबीने हवालदिल झालेली असते. खुशरु हा बऱ्यापैकी सुतारकाम करीत असतो. त्याची अपार कष्ट करण्याची तयारी असूनही त्याला काम मिळत नाही. खुशरुच्या या तकदिरमुळे रहिमतबीला दु:ख वाटत असते. त्यातच त्यांना अब्दुल, ऐनूल व आझम अशी तीन मूलं असतात. त्यामुळे संसाराला हातभार लावण्यासाठी रहिमतबी तेलाच्या गिरणीत कामाला लागते.

तेलाच्या गिरणीत काम करत असताना तिचे गिरणमालक धर्माप्पाशी सूत जुळते. या धर्माप्पाशी संबंध ठेवल्याने रहिमतबी गर्भार राहते. रहिमतबी एका कुलशीलवान घराण्यात वाढल्यामुळे व तिचे चालणे, बोलणे मर्यादशील असल्यामुळे कुणालाही तिचा संशय येत नाही.

रहिमतबीच्या मनाप्रमाणे जसा गर्भ पोटात वाढत होता तसे खुशरुला मोठे कामही मिळते. त्यामुळे वाढणारा गर्भ तकदीर घेऊन येत आहे, असे तिला वारंवार वाटते. तसे सबूतही तिला मिळत असतात. रहिमतबी आपल्या नवऱ्याला 'खुशरु' लाही होणारे मूल

तकदीर घेऊन येत आहे, असे सांगते. त्यालाही मोठे काम मिळाल्यामुळे व रेल्वेत नोकरी मिळण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे तिचे म्हणणे पटते.

पण प्रसुतीची वेळ जशी जवळ येईल तसे तिला हे मूल जन्माला येऊ नये, असे वाटते. कारण मूल जर धर्माप्पासारखे झाले तर आपले गुपित उघडकीस येईल याची तिला भीती वाटते. ती खुदाला प्रार्थना करताना म्हणते.

"मला मुआफी कर. रहेम कर माझ्यावर मला हे मूल नको, ते तकदीर नको, काही नको. हा बच्चा जिवंत पैदा होवू दे नको !"[१] पृ. कृ. १९.

अल्लाहच्या कृपेने तिला होणारे मूल चेहऱ्याने तिच्यासारखेच होते तेंव्हा रहिमतबीला तकदीरवाल्याच्या जन्मदात्याची (धर्माप्पाची) आठवण होते. ताकदीरवाल्या मुलाच्या जन्माच्या दुसऱ्यादिवशी खुशरुला पाच हजाराचे तिकीट लागते. त्यामुळे दोघांनाही आनंद होतो.

तिकीट लागल्याच्या आनंदात खुशरु असताना त्याला बाहेरुन धर्माप्पाच्या हृदयविकाराने मृत्यू झाल्याची बातमी समजते. ही बातमी तो रहिमतबीला देतो आणि घरातून बाहेर पडतो. ही बातमी ऐकताच तिच्या हातातील बर्फीचा तुकडा गळून पडतो. तिला विलक्षण दु:ख होते.

## 'प्रश्न चिमूटभरच'

ही कथा सन १९९१ मध्ये 'मराठवाडा' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली कथा आहे. या कथेत पेशाने डॉक्टर असलेल्या बुद्धीवंत व्यक्तीच्या वैफल्याचे चित्रण वसंत फेणे यांनी केलेले आहे.

या कथेतील नायक डॉक्टर हे वैद्यक शास्त्राची पदवी प्राप्त करुन विलायतेहून मुंबईत आलेले असतात. रुग्णांची सेवा करण्याशिवाय इतर कोणत्याही क्षेत्रात त्यांना रस नसतो. एक आदर्श नागरिक म्हणूनं जगावे एवढीच त्यांची इच्छा असते. त्यांचा जातीधर्माला विरोध असतो. ते मुद्दामच परजातीय तरुणीशी विवाह करतो. त्यांना एक मुलगा (चंद्रशेखर) होतो आणि एका मुलावरच ते समाधान मानतात. त्याला उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला पाठवतात.

त्याने भारतात येऊन इस्पितळ चालवावे व आपल्या शिक्षणाचा उपयोग मातृभूमीसाठी करावा असे डॉक्टरांना वाटते. पण चंद्रशेखर लग्न करुन अमेरिकेत स्थायिक होतो. तेंव्हा डॉक्टर व बाई त्याचे मन वळविण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. पण त्याचा काहीच उपयोग होत नाही. त्यामुळे दोघांनाही अतिशय दुःख होते. त्यामुळे डॉक्टर निराश होऊन इस्पितळ विकून टाकतात. त्यातील काही रक्कम ते गावातील संस्थेला मोफत वस्तीगृह बांधण्यासाठी देऊन टाकतात.

काही दिवसांनी बाईंची एकदमच तब्येत बिघडते. त्यातच तिचा मृत्यू होतो. त्यामुळे डॉक्टरांचे मन खचते. बाईच्या मृत्यूनंतर चंद्रशेखर डॉक्टरांना कायमचे अमेरिकेला येण्यास विनंती करतो. पण ते त्याला साफ नकार देतात. बाई गेल्यामुळे निर्बुद्ध, बंडोपंताबरोबर दिवस काढावे लागत असल्यामुळे त्यांना फार वाईट वाटते.

त्यातच अचानक चंद्रशेखरला किडणीचा आजार होवून त्याचा मृत्यू झाल्याची बातमी डॉक्टरांच्या कानावर पडते. त्यामुळे त्यांना जबरदस्त धक्का बसतो. मुलग्याच्या मृत्यूनंतर सूनबाईला डॉक्टर भारतात रहावयास येण्यास विनंती करतो. पण मुलांच्या शिक्षणामुळे ती भारतात राहू शकत नाही. त्यामुळे डॉक्टर निराश होतात.

त्यानंतर डॉक्टर आपणच गावी बांधून दिलेल्या वस्तिगृहामध्ये राहण्याचा विचार करतो. तेथे त्यांना वेगळीच परिस्थिती पाहावयास मिळते. तिथे त्यांना रहावयास जागा तर मिळतच नाही. पण तेथे त्यांना भारतातील भ्रष्टाचार वृत्तीचे दर्शन घडते. एकप्रकारे त्यांच्या मनात भारताविषयी तिरस्कार निर्माण होतो. डॉक्टर आपला निर्णय बदलून अमेरिकेला राहवयास जाण्यास तयार होतो.

सुनेनं होकार देताच डॉक्टर आपले सारे सामान मातीमोल किंमतीने विकून टाकतो. बंडोपंत जेंव्हा शेवटचा कचरा पायरीजवळ अंगणात टाकतो तेंव्हा ते त्यांच्यावर विलक्षण संतापतात. तेंव्हा उदासपणे बंडोपंत म्हणतो.

"किंमती वस्तू मातीमोलानं दिल्या आणि ही धूळ म्हणजे मातीच. ती आल्याड पडली काय, पल्याड पडली काय चिमूटभरं मातीचं कसलं कौतुक ?"[२] पृ. क्र. ५०

हे सत्य अनावधानाने निर्बुद्ध बंडोपंताच्या तोंडून बाहेर पडते आणि डॉक्टर निरुत्तरीत होऊन भानावर येतो. या कथेत लेखकांनी आदर्शवाद आणि वास्तवजीवन यातील अचूक अंतर टिपले आहे. प्रस्तूत कथेत नायक आदर्शवादाने पच्छाडलेला असतो. शेवटी वास्तव जीवनाची त्याला किंमत कळते. तेंव्हा वेळ गेलेली असते. . सारे जीवनच उद्धवस्त होते. इथे माणसाने नको त्या आदर्शवादी कल्पना, विनाकारण उराशी कवटाळू नयेत हेच जणू सत्य.

## 'नरनारायण'

ही कथा सन १९८९ मध्ये 'केसरी' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली कथा आहे.

या कथेतील नायक वामन याची पत्नी वर्षा ही आजारपणामुळे अंथरुणाला खिळलेली असते. तेंव्हा तिच्या उपचारासाठी करावे लागणारे प्रयत्न, त्यात येणाऱ्या अडीअडचणी यामुळे वामनच्या मनाची जी त्रिशंकू आवस्था होते. त्याचे चित्रण वसंत फेणे यांनी या कथेत केले आहे.

या कथेत वामनची पत्नी वर्षा व्रत-वैकल्य, उपास-तपास, जाग्रणं करुन आजारी पडल्याने अंथरुणाला खिळलेली असते. ती काही आठवडेच जगू शकेल. तिच्यावरील सर्व वैद्यकीय उपचार संपलेले असून परमेश्वराची प्रार्थना केल्यास काहीतरी चमत्कार घडू शकेल असे डॉक्टरांनी सांगितलेले असते. वर्षा अजारपणातून उठणार नाही असे समजल्यावर तो अतिशय दु:खी होतो. तो इस्पितळातून सरळ वर्गमित्र गोपूच्या घरी जातो. तो डॉक्टरांनी सांगितलेली सर्व हकीकत त्याला सांगतो. गोपूही त्याला आधार देतो. तो तेथून सरळ गद्रे या मित्राकडे जातो. त्यालाही सर्व हकीकत सांगितल्यावर तो त्याला अंतर्ज्ञानी नाना महाराजाबद्दल सांगतो. तेंव्हा वामन गद्रेने सांगितल्याप्रमाणे कल्याणची गाडी पकडून नंतर कल्याणहून टांग्याने घासबाजाराच्या दिशेने जातो. पण त्याला नानामहाराजांचा पत्ता सापडत नाही. तेंव्हा तो परत डोंबिवलीला जावून गद्रेला बरोबर घेऊन नाना महाराजांकडे जातो. पण नानामहाराज त्र्यंबकेश्वरीला गुरु बंधूकडे गेल्याने त्यांना भेटत नाहीत. त्यांना तेथे नानामहाराज चार दिवसांनी येणार आहेत असे समजते. त्याचबरोबर रात्रीची वेळ असल्याने शेवटची गाडीही

चुकते. त्यामुळे त्याला संपूर्ण दिवस अपशकुनी वाटतो. तेंव्हा त्याच्या मनात असंख्य विचार येतात.

तो परत तळेगावी वर्षाकडे येतो. तो तिला नानामहाराजांच्या संजीवक विभूतीबद्धल सांगतो व तिला खडखडीत बरी होशील असा विश्वास देतो. पण ती कन्हत "माझ्या भरल्या घरातच मरण येऊ दे, मला घरी न्या" असे म्हणते. तेंव्हा वामनचे डोळे भरुन येतात.

वामन पुन्हा वर्षाला सांगून विभूती आणण्यासाठी नाना महाराजांकडे जातो. त्यावेळी त्याच्या मनात ही संस्कृती, नाती गोती, भावभावंना याचा माणसाला त्रास का होतो ? हा विचार येतो. त्यावेळी त्याच्या मनात गोपूबद्दलचे विचार येतात. गोपच्या मते :

"हजारो वर्षापूर्वी म्हणजे ज्यावेळी माणूस मात्र इतर प्राणीमात्राप्रमाणे जगत होता म्हणजे आहार निद्रा, भय, मैथूनाच्या चौकटीत जगत होता त्या काळी तर त्या काळी ज्या दिवशी गुहामानवाच्या मनात इतर प्राण्याप्रमाणे नर मादी म्हणून न जगता या चौकटी पलिकडे जाण्याचं आलं, अस्पष्टपणे असेल, मी म्हणतो अत्यंत-अत्यंत अंधूकपणे असेल, पण त्याला नराचा नारायण होण्याची इच्छा ज्या दिवशी झाली तो मानवाच्या इतिहासातला काळाकुट्ट दिवस ! त्या दिवसापासून सहज नरत्व सुटत नाही, निखळ नारायणत्व भेटत नाही. अन या नर नारायणाची परवड संपत नाही."[3] पृ. क्र. ७४ हे गोपचे मत त्याला पटते. या विचारामुळे यातून आपली सुटका कधीच होणार नाही याची त्याला जाणीव होते. येथे लेखकांनी वामनच्या त्रिशंकू आवस्थेचे दर्शन घडविले आहे.

**'आकाशपुष्प '**

ही कथा सन १९९३ मध्ये 'मराठवाडा' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली कथा आहे.

या कथेत एकतर्फी प्रेमामुळे वेडा झालेल्या गुणाकरमुळे दिवगी मास्तर (बाप्पा) जाणकी (आई) यांची झालेली आवस्था व विहिरीत पडलेले आकाशपुष्प पाहत असताना गुणाकरचा झालेला करुण अंत याचे हृद्यस्पर्शी चित्रण वसंत फेणे यांनी केले आहे.

या कथेतील नायक 'गुणाकर' हा एक दर्जेदार मेकॅनिकल इंजिनिअर असतो. तो संजीवीच्या प्रेमापोटी शास्त्रीय संगीत शिकतो. संजीवी ही त्याच्या मामाची मुलगी असते. त्याचे तिच्यावर जीवापाड प्रेम असते. तो मुंबई सोडून मिरजेला नोकरीस जाणार असतो. तेंव्हा तो खास संजीवीला भेटण्यासाठी मामाकडे जातो. संजीवीला घरी एकटी पाहून तो तिला लग्नाची मागणी घालतो. त्यामुळे ती अतिशय संतापते व त्याला म्हणते.

"वेड लागलं कारे तुला वेड ? शरम नाही वाटत काही तरी बोलायला ? मी ग्रॅज्यूएट होणार ती काय फालतू डिप्लोमा होल्डरशी लग्न करायला"[४] पृ. क्र.९४

संजीवीच्या या शब्दाचा त्याच्या मनावर विपरीत परिणाम होतो. अशा आवस्थेतच तो मिरजेला नव्या नोकरीवर रुजू होतो. तेथील रजिस्टरे संजीवीच्या नावाने भरुन काढतो. वरीष्ठ अधिकाऱ्याने जाब विचारल्यावर त्यांनाच तो खडसावतो. ही गोष्ट बाप्पांना समजते. बाप्पा त्याला घरी घेऊन येतात. त्याच्यावर इलाज करतात. पण त्याचा काहीही उपयोग होत नाही. त्यामुळे बाप्पा व जाणकी ला दु:ख होते. संजीवीही जाणकीच्या सख्ख्या भावाची मुलगी असल्याने तिच्याकडून ही अपेक्षा जाणकीला नसते. तिच्यामुळे गुणाकर वेडा होतो. गुणाकर वेडा झाल्यामुळे त्याला हाताने भरविणे, शौचास नेणे, अंघोळ घालणे अशा प्रकारची सर्व कामे बाप्पा व जाणकीला करावी लागतात.

बाप्पा पोष्ट खात्यातून निवृत्त झाल्याने त्यांना धारवाडच्या चाळीत रहावयास जावे लागते. पण तेथे गुणाकरच्या ओरडण्याने चाळीतील लोकांना त्रास होतो. त्यामुळे चाळ मालकाच्या सांगण्यावरुन घर सोडावे लागते. तेथून बाप्पा कुटुंबासह हुबळीला राहावयास येतात. पण तेथे मुलांची टोळकी, गुणाकरला त्रास देऊ लागल्याने त्यांना इच्छा नसतांनाही वडिलोपार्जित जागेत केंपदकलला स्थलांतरीत व्हावे लागते. त्यांचा लहान मुलगा करुणाकर याने लग्न करुन संसार करावा व गुणाकरला त्याने सांभाळावे अशी बाप्पा व जाणकीची अपेक्षा असते. पण करुणाकर संन्याशी मार्ग पत्करुन घरदार सोडतो. त्यामुळे ते दोघेही निराश होतात.

आपल्या मृत्यूनंतर गुणाकरचे कसे होईल ? ही चिंता त्यांना नेहमी सतावत असते. तेंव्हा ते आपली सर्व जमीनजुमला जावई व मुलगी उर्मिला हिच्या नावावर करुन त्यांना गुणाकरला सांभाळण्याची अट घालण्याचे ठरवितात, पण चार चार वेळा पत्र पाठवूनही उर्मिला एकटीच येते. कुठे सह्या केल्या न केल्या असे करुन ती आपल्याला जमीन जुमलाचा हाव नसल्याचे दाखवून निघून जाते. तेंव्हा दोघांनाही उर्मिला गुणाकरला सांभाळू शकत नाही याची जाणीव होते. त्यामुळे त्यांना अतिशय वाईट वाटते.

एकेदिवशी बाप्पा व जाणकी संध्याकाळचे जेवण आटोपल्यानंतर अंगणात गप्पा मारत असताना अचानक गुणाकरला शौचास येते. तेंव्हा बाप्पा त्याला घेवून परसदारी जातात. माडाच्या झाडाजवळ कंदील व तांब्या ठेवून विहीरीजवळील दगडावर जावून बसतात. गुणाकरचा कार्यभाग आटोपल्यानंतर बाप्पा कंदील व तांब्या आणण्यासाठी माडाच्या झाडाजवळ जातात. तेंव्हा गुणाकर विहीरीजवळ येऊन विहीरीत वाकून पाहतो. तेंव्हा त्याला त्यात आकाशातील चांदण्या (आकाशपुष्प) दिसतात. तेंव्हा त्याचा आकाशपुष्प पाहत असताना विहीरीत पडून करुण अंत होतो. या कथेला दिलेले शीर्षक योग्य असून या कथेचा शेवट मनाला चुटपूट लावणारा आहे. एका निरागस मतीमंद मुलाच्या जगण्या मरण्याचा विचार मनाला अंतर्मुख करुन जातो.

**' धर्मसंकट '**

ही कथा सन १९९५ रोजी 'प्रतिष्ठान' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली आहे. या कथेत इराणमध्ये शहा राजवटीविरुद्ध बंड पुकारुन खुमेनी राजवटीने धर्माच्या नावाखाली सत्ता प्रस्थापित केली. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबांना जगणे कसे असह्य होते याचे हृदयस्पर्शी दर्शन या कथेत घडते.

या कथेतील 'मसूद' हा दंतवैद्य झाल्यानंतर तो घरच्यांचा विरोध पत्करुन तेहरानला इस्पितळ काढतो व पत्नी ताहेरासह तेहरानमध्ये स्थायिक होतो. अमेरिकेच्या सहकार्याने तेथील शाह राजवट आधुनिकीकरणाकडे वाटचाल करीत असते. पण तेथील कट्टर धर्मवेड्या

इस्लामीवादी गटाला अमेरिकेचे वर्चस्व मान्य नसते. तेंव्हा हा कट्टर इस्लामीवादी खुमेनी गट अमेरिकेच्या हस्तकाविषयी बंड पुकारुन आपली सत्ता प्रस्थापित करतो. धर्माच्या नावाखाली पाश्चात्य विचार, संस्कृती नष्ट करण्याचा सपाटा ते सुरु करतात. त्यामुळे पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या, पाश्चात्य संस्कृतीत वाढलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबाना जगणे असह्य होते. त्यांनी इमामच्या विरोधात जाण्याचा प्रयत्न केला तर त्यांना आपल्या प्राणांना मुकावे लागत असे. या सर्व प्रकारामुळे पाश्चात्य शिक्षण घेतलेले मसूद व ताहेरा हे जोडपे भीतीच्या वातावरणात कसेबसे दिवस कठंत असते.

ताहेराची नणंद 'परवीन' ही पाश्चात्य शिक्षण घेतलेली एक टायपिस्ट असते. एकेदिवशी परवीन आपल्या नवऱ्याबरोबर 'चादोंर' चढवून खरेदीसाठी बाजारात जाते. तेंव्हा तिचा नवरा पैसे आणावयास विसरतो. तेंव्हा तो परत पैसे आणण्यासाठी घरी जाताना त्याचा वाटेत अपघात होतो. तेंव्हा त्याला सरळ इस्पितळात दाखल केले जाते. परवीन वाट पाहून घरी जाते. पण घराला कुलूप असते. परत ती बाजारात येते. तिच्या चंचलवृत्तीने ती धर्मरक्षकांच्या तावडीत सापडते व तिची रवानगी कोठडीत केली जाते. तेंव्हा तिला बदफैली ठरवून धर्मशास्त्र, मैदानात एका खांबाला बांधून तिला जमावामार्फत दगडाने ठेचण्याचा आदेश देते. त्यामुळे तिची चादोर फाटून, तिच्या शरीराचे मांस लोंबकळू लागते. ही बातमी मसुदला कळताच तो त्या ठिकाणी जातो. पण तिचे रक्ताळलेले धड पाहून तो बेशुद्ध पडतो.

त्याचबरोबर मसूद व ताहेराचा मुलगा 'मोहतरम' हा खुमेनी राजवटीतच वाढत असतो. तो शाळेतून घरी येऊन, आईला परवीनअत्या बदफैली असल्याचे सांगतो. तेंव्हा ताहेरा त्याच्यावर रागावते. त्यामुळे मोहतरम चिडून म्हणतो. " तू इमामच्या बाजूनं की विरुद्ध बोल"[५] पृ. कु. १०४ या त्याच्या बोलण्याने ती धास्तावते. तसेच त्याची सैन्यात भरती होण्याची इच्छा असते. त्यामुळे त्यांना अधिकच भीती वाटू लागते.

या इमामच्या विरुद्ध कोणीतरी लढा दिला पाहिजे व ही राजवट उलथवून लावली पाहिजे, असे मसूदला वारंवार वाटत असते. तशी भावना ती आपल्या धाकट्या बंधूकडे (मूर्तिझाकडे ) व्यक्त करतो. एकेदिवशी फिदाय गेरीला या क्रांतीकारी संघटनेच्या मुली या

इमामाविरोधी बंड करण्याचे धाडस करतात. पण त्या मुलींनाही पकडून, त्यांच्यावर सामुदायिक बलात्कार करुन, खांबाला बांधून, जमावामार्फत दगडाचा मारा करुन, संपवले जाते. हे दृश्य पाहून ताहेरा, मसूद व मुर्तिझा यांचे मन कळवळते. पण त्यांचे इमामाविरोधी जाण्याचे धाडस होत नाही. धर्मामुळे माणसावर कसे संकट बेतते याचे यथार्थ दर्शन लेखकांनी या कथेत घडविले आहे. तसेच मुस्लिम संस्कृतीचे दर्शन ही प्रस्तूत कथेत घडते.

## 'ज्यांचा त्याचा क्रूस'

ही कथा सन १९९३ मध्ये 'सावाना' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली आहे. या कथेतील नायक 'नॉरमन डी प्रॉफ्ट' ही एक श्वेतवर्णीय व्यक्ती असून त्यांनी कृष्णवर्णीयांच्या उन्नतीसाठी केलेल्या संघर्षाचे चित्रण आणि कृष्णवर्णीय मुलगीवर प्रेम करणारा त्याचा मुलगा मार्क याने स्वत:वर गोळी घालून, केलेली आत्महत्या यामुळे नॉरमनला झालेले दु:ख याचे करुण चित्रण वसंत फेणे यांनी या कथेत केले आहे.

या कथेतील नायक नॉरमन हा कृष्णवर्णीयांच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील असून त्यासाठी संपूर्ण आयुष्य संघर्षमय जीवन जगत असतो. जोहान्सबर्गमध्ये कृष्णवर्णीयांच्या चळवळीने हिंसेचे स्वरुप धारण केल्यामुळे शहरात दररोज आठ ते दहा मुडदे पडू लागतात. त्यामुळे गोऱ्यांच्या मायनॉरिटी सरकारने कृष्णवर्णीयांचा नेता नेल्सन मंडेला याची मुक्तता करुन त्यांच्या मागण्या मान्य केल्या. कृष्णवर्णीयांच्या मागण्या मान्य झाल्यामुळे इकांथा फ्रीडम पार्टीच्या झूलू कार्यकर्त्यांना हे आवडत नाही. ते काळ्यांच्या वस्तीवर हल्ला करतात. त्यामुळे दोन्ही गटाचे पंधरा-वीस मुडदे पडतात. अशा परिस्थितीमुळे शहर हादरुन जाते. या सर्व परिस्थितीवर नॉरमन एका भाषणात झुलू देतो. तेंव्हा नॉरमनच्या घरी असलेली झुलू जमातीतील थांडी नावाची नोकरानी काम सोडते. त्यामुळे नॉरमनला दु:ख होते.

नॉरमनचा मुलगा मार्क हा कृष्णवर्णीय विनी जॅक्शन या मुलीच्या प्रेमात पडतो. नॉरमनही त्याच्या प्रेमाला मान्यता देऊन लग्नाला होकार देतो. पण एकेदिवशी मार्क व विनी फिरायला जात असताना कृष्णवर्णीयांचे टोळके त्यांना अडवते. ते मार्कला जबर मारहाण

करतात. त्यामुळे त्याला इस्पितळामध्ये दाखल करावे लागते तर विनीला ते घेऊन जातात. तिच्यावर ते सामुदायिक बलात्कार करतात. तिच्या शरीराचे तुकडे तुकडे करुन फेकून देतात.

मार्कला इस्पितळातून घरी आणल्यानंतर पुन्हा नॉरमन कृष्णवर्णीयांच्या हक्कासाठी सार्वमताच्या प्रचार कार्यास स्वत:स झोकून देतो. पण काही कालावधीनंतर मार्कला विनीच्या हत्येची बातमी समजते. तेव्हा मार्कचे वडील नॉरमन सार्वमताच्या कामासाठी बाहेर गेले असता तो स्वत:वर गोळी झाडून घेतो व त्यातच त्याचा मृत्यू होतो. त्यामुळे नॉरमन दुभंगलेल्या मनस्थितीत भावनाशील होऊन स्वत:च्या मनाशीच पुटपुटतो.

''जिच्या उन्नयनासाठी अवघं आयुष्य संघर्षमय केलं ती मानवी संस्कृती......''

.......... आणि ज्याचा त्याचा क्रूस .......... आपल्या पाठीवरचा..........

विनीचा तसा शतखंड अंत, मार्कची अशी अखंड आत्महत्या, हेदेखील माझा शहाणा पोरगा म्हणाला, त्याप्रमाणं त्या संस्कृतीचाच भाग ? :......... का हेच तिचं भागधेय ?

........ का हीच त्या परमेश्वरी अस्तित्वाची क्रूसिफाईड खूण''[६] पृ. क्र. १४५

आणि त्याला एकदमच रडू कोसळते. या कथेचे कथानक मनाला चुटपूट लावणारे असून माणसाच्या मनातील भावभावनांचे व राजकीय ताणतणांवाचे दर्शन या कथेत घडते. याशिवाय प्रस्तूत कथेतून काळे आणि गोरे यांच्यातील संघर्ष, कृष्णवर्णीयांच्या उन्नतीसाठी झटणारा 'नॉरमन' फेणे यांनी उभा केला आहे. परंतु त्याला ही कृष्णवर्णीय चळवळीला उन्नत करण्यात यश येत नाही. तो हताश होतो. आणि ज्याचे त्याचे मरण त्यांच्या त्यांच्या पाठीवरच्या क्रुसावर असते असे सांगतो. परदेशी संस्कृती, ख्रिश्चन मशनिरीचे विचारही प्रस्तूत कथेत फेणे न कळतपणे मांडतात.

## 'अनाकलनीय'

ही कथा सन १९९० मध्ये 'मराठवाडा' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली आहे. या कथेत घरातील विसंगत वातावरणामुळे अनेक वृद्धांना आपले स्वत:चे घर सोडून

वृद्वाश्रमाचा आश्रय घ्यावा लागतो. इथे वृद्धांच्या व्यथा-यातना व भावनाशील मनाचा वेध वसंत फेणे यांनी घेतलेला आहे.

'अनाकलनीय' या कथेत दाजी धारवाडकर याची पत्नी उमाबाई ही फाटकळ स्वभावाची असल्याने तिच्या या स्वभावाला कंटाळून, मुलाने व सुनेने दोघांनाही वृद्धाश्रमात आणून टाकलेले असते. वृद्धाश्रमातही ती दाजींना मानसिक त्रास देऊन सतावत असते. तेंव्हा वृद्धाश्रमात दोन तीन वर्षापासून राहत असलेले व सतत प्रसन्न मुद्रा असणारे नाथजी यांचेकडे दाजी जातो. तो त्यांना सुखासमाधानाबद्दल उपाय विचारतो. तेंव्हा त्याच्याकडून समजलेली माहिती आश्चर्य व्यक्त करणारी असते. नाथजीच्या लग्नाच्या तिसऱ्या वर्षीच पत्नीचे निधन झाल्याने तो एका कर्नाटकातील भावीणबरोबर लग्न न करता राहत असतो. त्यामुळे त्याच्या आप्तांनी त्याच्याशी संबंध तोडलेले असतात. काही वर्षांनी ती भावीण निघून जाते. त्यामुळे तो अतिशय दु:खी होतो. त्याला आता कसलाच आधार उरला नसल्याने तो सरळ वृद्धाश्रमाचा मार्ग धरतो. वृद्धाश्रमात येवून तो नित्यनियमाने नामस्मरण करुन, प्रसन्न व समाधानी बनतो, याचे दाजीना आश्चर्य वाटते.

या वृद्धाश्रमात असलेली कामत काका ही व्यक्ती पोस्ट खात्यात नोकरीस असते. तर त्याची पत्नी मंत्रालयात अँडर सेक्रेटरी असते. तो पत्नीला कंटाळून वृद्धाश्रमात आलेला असतो. ही संपूर्ण कथा चर्चात्मक स्वरुपाची असून या कथेमधून लेखकांनी वृद्धांच्या समस्या व्यथा यातना यावर प्रकाश टाकला आहे.

आधुनिक युगामध्ये, तरुणपणाच्या चंगळवादी संस्कृतीमध्ये वृद्ध माणसांची कसे ससेहोलपाट होते. शेवटी त्यांना वृद्धाश्रमाशिवाय आसरा नसतो. फॅशनच्या आधुनिक युगामध्ये म्हाताऱ्या माणसांची तरुण शिकलेल्या मुलाना अडचण वाटते आणि मग ह्या वृद्धाची आवस्था कशी होते हे फेणे यांनी प्रस्तूत कथेतून मांडले आहे.

# बदलत्या जीवनातील कोसळणाऱ्या सनातन मुल्यांचा वेध घेणारा "पाण सावल्याची वसाहत" हा कथासंग्रह

"पाणसावल्यांची वसाहत" ही वसंत नरहर फेणे यांचा सन १ मे २००१ रोजी स्वरुप प्रकाशन औरंगाबादने प्रकाशित केलेला कथासंग्रह आहे. फेणे यांच्या या कथासंग्रहात 'नवी सददी येता येता ', 'मागे परतोनी पाहे ', 'अल्याड-पल्याड ', 'कल्पांतकालीन काही क्षण', 'पैसाची पोकळी ', 'शोध आणि बोध ' व 'बरं का मुलांनो ' अशा एकून सात कथा समाविष्ट आहेत. 'पैसाची पोकळी' ही १९९४ मध्ये प्रकाशित झालेली एक कथा वगळता बाकी सर्व कथा सन १९९९ मध्ये दिवाळी अंकामधून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

गेल्या पंचवीस वर्षापासून भारतीय जीवनात आमुलाग्र बदल घडत आहेत. अत्यंत वेगाने भारतीय जीवन आधुनिकतेकडे वळत आहे याचे पारदर्शी चित्रण वसंत फेणे यांनी या कथासंग्रहात केलेले आहे. बदलत्या जीवनातील कोसळणाऱ्या सनातन मुल्यांचा वेध घेताना ते समग्र वास्तवाचे आणि त्या वास्तवात वावरणाऱ्या माणसाचे भावविश्व त्यांनी मोठ्या ताकतीने या कथासंग्रहात मांडलेले आहे.

महानगरीय जीवन, त्या जीवनातील ताणतणाव, माणसाच्या अंत:करणातील खोलवर दडून असणाऱ्या विविध वृत्ती-प्रवृत्ती, स्वार्थी भावना व त्यातून निर्माण होणारी मुल्यांची घसरण इत्यादी वैशिष्ट्ये ते या कथासंग्रहातून मांडताना दिसतात. त्यादृष्टीने वसंत फेणे यांच्या पाणसावल्यांची वसाहत या कथा संग्रहातील कथा अत्यंत महत्वाच्या वाटतात. त्याचा थोडक्यात आढावा :

## 'नवी सद्दी येता येता '

ही कथा सन १९९९ मध्ये 'महाराष्ट्र टाईम्स वार्षिक' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली कथा आहे.

या कथेत गिरणीकामागारांच्या संपामुळे कामगारांची झालेली दयनीय अवस्था, उद्‌भवलेली बेकारी व या बेकारीमुळेच या कथेतील नायक  संजयराव साळुंखे हा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे झुकतो. पण तो पत्नी वर्षाच्या सल्ल्याने राजकीय क्षेत्रात उतरतो. राजकीय क्षेत्रात मोठा दबदबा निर्माण करुन, नगरसेवक बनलेल्या संजयराव साळुंखेचा 'खून का बदला खून' या सूडभावनेने खून होतो. या सूडभावनेचे प्रस्तूत कथेत चित्रण वसंत फेणे यांनी केले आहे.

या कथेतील नायक संजयराव साळुंखे हा गिरणी  कामगार धोंडीबाचा मुलगा असतो. गिरणीकामागारांच्या संपामुळे गिरणगावातील लोकांच्यावर उपासमारीची वेळ येते. अशा परिस्थितीत एस.  एस. सी. झालेल्या संजयवर बेकारीची कुऱ्हाड कोसळते. एकेदिवशी तो शिपाईपदाच्या मुलाखतीसाठी ठाण्याला जातो. पण निराश होवून संध्याकाळी घरी परततो. दिवसभर उपाशी असल्याने लगेच जेवायला बसतो. तेंव्हा भावजय व त्याच्यात वाद होतो हे प्रकरण त्याचा थोरला भाऊ अशोक आल्यानंतर आणखी चिघळते. तेंव्हा संजय त्याचक्षणी घर सोडतो व तो सरळ भाईगिरी टोळीत सामील होतो.

भाईगिरी टोळीत संजय नावारुपाला येतो त्या टोळीत तो 'संज्या टाळक्या' या नावाने प्रसिद्ध होतो. त्याच टोळीत बी. एस नावाने ओळखल्या जाणाऱ्या सदस्याची बहीण संध्या ही त्याला अतिशय आवडू लागते तो सरळ तिला लग्नाची मागणी घालतो. तिलाही तो आवडत असतो पण ती अतिशय दक्ष व हुशार असते ती संजयला म्हणते. "लग्नानंतर तुला दुसऱ्या बाईशी संबंध ठेवता येणार नाहीत . पण तुझ्याशी लग्न करण्याआधी तुझं रक्त तपासून घ्यावं लागेल."[७] पृ. क्र. १५.

त्यामुळे संजय अतिशय भडकतो. पण सध्या आपल्या मतावर ठाम राहिल्याने त्याला रक्त तपासणी करावी लागते. त्यानंतर ते दोघे विवाहबद्ध होतात.

एकदा त्याच्या भाईने एका खुनाचे काम त्याच्यावर व आणखी एका साथीदारावर सोपविलेले असते. ते दोघेही काम फत्ते करतात. पण त्या दोघांनाही पोलीस पकडतात. त्यांच्यावर खुनाचा गुन्हा नोंद होतो. पण कोर्ट त्यांना पुराव्याअभावी सोडून देतो. या खुनामुळे संजयचा आणखी दबदबा वाढतो.

संजयने ज्या मध्यमवर्गीय मालकाचा खून केला होता. त्याच्या घरातील लहान मुले व पत्नी खून पाहून भूरळ येण्याजोगी असल्याने त्या कुटुंबाकडून आपल्याला घातपात होईल याची भीती त्याला वाटत नव्हती. पण एकेदिवशी त्याचा भाई व संध्याचा भाऊ हे दोघेही पोलीस चकमकीत मारले जातात. त्यामुळे संजयला मृत्यूची भीती वाटू लागते. तेंव्हा संजय पत्नीच्या मदतीने राजकीय पक्षाचा आसरा घेतो. तो एका राजकीय पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता बनतो. पण काही आठवड्यांनी पोलीस त्याला एका वेगळ्याच गुन्हयाखाली अटक करतात. पण त्याची पत्नी संध्या ही अतिशय हुशार असते. ती हा एक राजकीय डाव असल्याचे जाहीर करुन दोन चारशे स्त्रीयांना बरोबर घेवून रास्ता रोको आंदोलन करते. त्यामुळे दोघांचाही राजकीय क्षेत्रात दबदबा निर्माण होतो. त्याच वर्षभरात मनपाची निवडणूक लागते. त्या निवडणुकीत एका प्रतिष्ठीत उमेदवाराला पराभूत करुन, तो निवडून येतो. त्यामुळे परिस्थिती बदलते. भाईगिरीच्या टोळीत असताना ज्या पोलिसांनी त्याला मारहाण केलेली असते तेच पोलीस त्याला सलाम ठोकू लागतात.

एकेदिवशी संजयराव पार्टी ऑफीसमधील कामकाज आटोपून बाहेर पडतो, तो सरळ घरापासून काही असलेल्या वाईन शॉपजवळ येऊन टॅक्सी थांबवतो. आपल्या एका कार्यकर्त्यांला 'स्टफ' आणावयास पाठवतो. इतक्यात संजयने ज्या मध्यमवर्गीय मालकाचा खून केलेला असतो. त्याचा मुलगा गज्जू याने पाठवलेले गुंड तेथे येतात. ते संजयवर गोळ्यांचा वर्षाव करुन फरार होतात. त्याचक्षणी संजयचा मृत्यू होतो. काही वर्षापूर्वी संजयने पोटासाठी जो मार्ग निवडलेला असतो. त्याच मार्गाने ते गुंड त्याचा सुपारी घेवून खून करतात.

प्रस्तूत कथेत नायक पोटासाठी गुन्हेगारीकडे वळतो. मोठा भाई होतो. मध्यमवर्गीयाचा खून करतो. शेवटी त्याचाही खून होतो. शहरातील गुन्हेगारी, राजकीय वातावरण आणि सर्वसामान्य जीवन जगणाऱ्या माणसाला हाकनाक मृत्यूला सामोरे जावे लागते याचे प्रत्ययकारी चित्रण या कथेत घडते.

## 'मागे परतोनी पाहे'

ही कथा सन १९९९ रोजी 'स्त्रग्धरा' या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झालेली आहे. या कथेतील नायिका 'रुपा' ही धनूबरोबर लग्न न करता सहजीवन व्यथीत करीत असल्यामुळे आई, वडील, भाऊ, ताई यांना झालेले दु:ख, त्यांना लोकनिंदेची वाटणारी भीती, त्याचबरोबर रुपाच्या मनात येणारे विचार, तिच्या भावना आणि त्यातून आपल्या समंजस प्रगल्भ, प्रेमळ आईचं तिला उलगडत गेलेले रुप याचे चित्रण या कथेत लेखक वसंत फेणे यांनी केले आहे.

या कथेतील नायिका 'रुपा' ही वडिलांची सर्वात लाडकी असते. त्यामुळे ती चुकीचे वागणार नाही अशी त्यांची खात्री असते. ती विधीवत धनूबरोबर लग्न करुन सुखाचा संसार करेल अशी त्यांची अपेक्षा असते. पण ती धनूबरोबर लग्न न करता सहजीवन व्यथीत करण्याची भूमिका घेते. त्यामुळे ते अतिशय दु:खी होतात. तिला समजावण्याचा प्रयत्न आई, वडील, दादा, ताईसह सर्वजण करतात. पण ती आपल्या मतावर ठाम असते. त्यामुळे आई वडिलांसह सर्वच भावंडे निराश होतात. शेवटी आई तिला निराशवृत्तीने म्हणते.

''रुपा तुझ्या भविष्यात काय आहे हे माहीत नाही. ज्या रस्त्याने तू जातेस असं तुला वाटते, तो रस्ता नाही, चकवा आहे. चकव्यात तू सापडू नयेस म्हणून आम्ही सर्व प्रयत्न केले. हे एवढ्यासाठीच सांगते, की मागे पुढं आई वडिलांनी, भावंडानी सावरलं नाही असा दोष तू कुणाला देवू नयेस. तू स्वखुशीनं आम्हा सर्वांकडे पाठ फिरवून जात आहेस. हे लक्षात घे आता तुझ्या कोणत्याही सुख दु:खाच्या प्रसंगी, अडीअडचणीला हे घर तुला मुकलय कायमचे, नीघ आता.''[८] पृ. क्र. ४९.

या आईच्या स्पष्ट बोलण्यामुळे तिला विलक्षण अपमान वाटतो. तेंव्हा ती चिडून निव्वळ अंगावरील कपड्यावर घराबाहेर पडते. ती सरळ धनूजवळ येते. तेंव्हापासून त्यांच्या सहजीवनाला सुरुवात होते.

एक वर्षाच्या कालावधीनंतर आई धनूबरोबर राहत असलेल्या रुपाकडे येते. तेंव्हापासून आई पंधरा-वीस दिवसांनी सतत तिच्याकडे येवू लागल्याने त्यांच्यात मैत्रीणीसारखे जवळचे

संबंध येतात. आईनेही आपल्या मनातील सर्व गोष्टी रुपाला सांगितल्यामुळे तिचेही मन भरुन येते.

आईची सतत ये-जा असल्याने आईच्या भूमिकेतून ती मागे परतून घरातील प्रकाराकडे पाहिल्यावर तिला वडिलापेक्षा आईचा सोशिकपणा व तिची उदारता जास्त करुन जाणवते.

एकेदिवशी रुपा इंजिनियरींगचे काम संपवून घरी येते. तेंव्हा तिला दरवाजात एक चिठ्ठी मिळते. त्या चिठ्ठीतून तिला आईचे निधन झाल्याचे समजते. ती घरातून रिक्षाने ताबडतोब निघते. पण तिला प्रेत दर्शन होत नाही. सर्व मंडळी प्रेतास धन देऊन परत आलेले असतात. तेंव्हा ती वडिलांना त्यांच्या रुममध्ये भेटण्यास जाते. पण ते मुद्दाम भिंतीकडे मान वळवून डोळे मिटवून घेतात. त्यामुळे तिला अतिशय वाईट वाटते. एकीकडे आईचा मृत्यू तर दुसरीकडे वडिलांचे दुर्लक्ष यामुळे तिला अतिशय दु:ख होते. तेंव्हा तिच्या मनाला वाटते.

'मन घासून पुसन लख्ख करावं' न्हावून धुवून नजर स्वच्छ करावी. आणि पूर्वग्रहाशिवाय मागे परतून साऱ्या प्रकाराकडं पहावं. समजून घ्यावं. पण आता ते कसं शक्य आहे ? आई नसताना ?''[१] पृ. क्र. ६४ याची तिला खंत वाटते.

प्रस्तूत कथेत नात्यांच्या बंधनाना नकार देऊन प्रेमात गुरफटून जाऊन लग्न न करता भारतीय धर्म संस्कृतीच्या विरोधात जाऊन रुपा धनुबरोबर सहजीवन जगते, आईवडीलांना सोडून जगते, परंतु नंतर परत मागे येते. परंतु आई मरुन जाते, वडीलांच्या मनातून तिने केलेला अघोरीपणा जात नाही. अर्थात या भारतीय परंपरा रुढी विरुद्ध जाऊन सहजीवन जगल्यामुळे रुपाला कसा त्रास होतो याचे प्रत्ययकारी चित्रण येते.

## 'अल्पाड - पल्याड'

ही कथा 'कार्तिक' या दिवाळी अंकातून सन १९९९ मध्ये प्रसिद्ध झालेली आहे. या कथेतील निवेदक जयंत हा एक लेखक असून, त्याची पत्नी विजया हिचा मृत्यू झाल्याने व ते दोघेही निपुत्रिक असल्याने त्याच्या सख्ख्या भावाने व भावजयीने स्वत:च्या स्वार्थासाठी त्याला

वेडा ठरवून, वेड्याच्या इस्पितळामध्ये चलाखीने भरती केल्यामुळे जयंतला झालेले दु:ख , मानवी स्वार्थीवृत्ती याचे चित्रण या कथेत वसंत फेणे यांनी केले आहे.

या कथेतील नायक जयंत हा एक लेखक असतो. जयंत व विजया या पती-पत्नीना मुलबाळ होत नसल्याने ते विजयाची बहीण नंदिनी हिचा मुलगा विनित याला दत्तक घेण्याचे ठरवतात. नंदिनी सुरुवातीला विनितला दत्तक देण्यास तयार होते. विनित हा विजयाच्या घरी लहाणाचा मोठा होतो. जयंत व विजया हे विनितला डॉक्टर करण्यासाठी लाखो रुपये खर्च करतात. पण विनित डॉक्टर होणार म्हटल्यावर नंदिनी त्याला दत्तक देण्यास टाळाटाळ करु लागते आणि एकेदिवशी साफ नकार देते. तिने नकार देताच विजयाला धक्काच बसतो आणि त्या धक्क्याने तिचा मृत्यू होतो.

पत्नीच्या मृत्यूने जयंत एकाकी पडतो. त्या परिस्थितीचा फायदा त्याचा भाऊ, बहीण व मेहुणी घेते. हे तिघेही जयंतच्या संपत्तीवर डोळा ठेवून असतात. जयंत हा लेखक असल्याने त्याला आपली पत्नी विजयाच्या स्मृतीस एक कादंबरी अर्पण करावयाची असते. त्यासाठी त्याचा वेड्याच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याचा मानस असतो. तेंव्हा तो वेड्याच्या इस्पितळाच्या अधिकाऱ्याला पत्र पाठवून परवानगी घेतो. नेमक्या याच गोष्टीचा फायदा त्याचा भाऊ व भावजय घेते. पंकज जयंतच्या आधी इस्पितळात जातो आणि अधिकाऱ्याची भेट घेतो. तो त्या अधिकाऱ्याला गटवून जयंतला वेडा ठरविण्याचे नियोजन करतो.

जयंत इस्पितळामध्ये गेल्यावर इस्पितळाचे अधिकारी त्याच्या मदतीसाठी एक 'वार्डन' पाठवितो. तो वार्डन जयंतला एस. आर. नावाच्या चांगल्या वेड्याकडे घेऊन जातो. एस. आर. या वेड्याची हकीकत जयंत ऐकत असतो. इतक्यात तो अधिकारी जयंतला पकडून आणण्यासाठी दोघा-तिघांना पाठवितो. ते जयंतला पकडून पांढरे शुभ्र कपडे घालण्यासाठी नेऊ लागतात. तेंव्हा जयंत त्यांना म्हणतो, ''अहो मी लेखक आहे लेखक ! विचारा तुमच्या साहेबाला ."[१०] पृ.कृ. ८६

असे तो त्यांना आरडून ओरडून सांगतो पण त्याचा काहीच उपयोग होत नाही. त्याचवेळी सकाळी आदराने बोलणारे अधिकारी हातात छडी नाचवत येतात व त्याला

म्हणतात, 'मार खायचा कारे थेरड्या' तेंव्हा जयंतच्या तोंडातून शब्दच फुटत नाही. त्याला आपल्या सख्ख्या भावानेच हा कुटील डाव केल्याचे समजते. त्यामुळे तो विलक्षण दुःखात बुडून जातो. या कथेत माणूस स्वार्थासाठी रक्ताच्या पवित्र नात्याला सुद्धा विसरतो याचे दर्शन लेखकांनी घडविले आहे.

## 'कल्पांतकालीन काही क्षण '

ही कथा 'साधना' या दिवाळी अंकातून सन १९९९ मध्ये प्रसिद्ध झालेली आहे. या कथेत ग्लासनोस्तनंतरच्या सोविएत रशियाच्या विघटनामुळे जार्जियातून हाकलून दिलेल्या दमित्री या वृद्धाची कैफियत वसंत फेणे यानी रेखाटली आहे.

या कथेतील नायक 'दमित्री' हा सेनादलात सैनिक असतो. दुसऱ्या महायुद्धात सोविएत रशियन सैनिक म्हणून जर्मनीविरुद्ध लढताना जखमी झालेला असतो. युद्ध समाप्तीनंतर तो हजारो सैनिकाबरोबर सेवानिवृत्त होतो. पण पुढे रशियन संघराज्यातील राजकीय परिस्थिती बदलते आणि त्यामुळे सोविएत संघराज्यामध्ये फूट पडते. तेंव्हा दमित्रीच्या कुटुंबाला रशियन म्हणून हाकलून दिले जाते. त्यामुळे दामित्रीचा मुलगा राहण्यासाठी आसरा व कामधंदा मिळविण्यासाठी तुर्कस्तानला जातो. पण तेंव्हापासून तो कायमचा परागंदा होतो. त्यामुळे दमित्री अतिशय दुःखी होतो.

एकेदिवशी दमित्री मुलग्याच्या आठवणीत मग्न होऊन बसले असता अचानक जार्जियातील गुंड प्रवृत्तीचे लोक रशियन वस्तीतील त्याच्या कुटुंबावर हल्ला करतात. त्याची सोळा वर्षाची नात 'तात्याना'ला ते टेंपोत घालून उचलून नेतात. त्यावेळी त्याने व त्याच्या सुनेने निकराचा प्रतिकार केला. पण त्याचा काहीच उपयोग होत नाही. तेव्हा त्याची सून पोलिसांत तक्रार नोंदवते. पण तेथील पोलिस अधिकारी तिच्याकडे संभोगेच्छेने पाहू लागतो. पण तरीही ती त्या अधिकाऱ्याला तात्याना बद्दल याचना करु लागते. तेव्हा तो तिला थोपटू लागतो. तेव्हा ती त्याला तात्यानाला सुखरुप घरी पोहच केल्यास इच्छा पूर्ण करण्याचा शब्द देते. पण तरीही तात्याना सापडत नाही. या घटनेमुळे तर दमित्रीला रडूच कोसळते.

जार्जियातून हकालपट्टी झाल्याने नव्या आसऱ्याच्या शोधासाठी तो आपल्या शिक्षिका असलेल्या सुनेबरोबर शासकीय कचेरीत जातो. कचेरीच्या जवळ गेल्यानंतर त्याची सून व नातू कचेरीच्या गर्दीत शिरतात आणि तो एका भिंतीच्या आडोश्याला बसतो. तेथे त्याची एका म्हातारीशी ओळख होते. त्या म्हातारीचा मुलगा डॉक्टर असतो. तोही कचेरीत आसऱ्याच्या शोधासाठी आलेला असतो. कचेरीतील काम आटोपून तो बाहेर येतो. त्याला मास्कोत घर व नोकरी दोन्ही मिळालेले असते. थोड्याच वेळा दमित्रीचा नातू इवान आपल्याला नवे गाव मिळाल्याचे त्याला सांगतो. पण तेथे त्याच्या कुटुंबाला घर व नोकरी मिळाली नसल्याने तो निराश होतो. तेव्हां तो मनातल्या मनात पुटपुटतो.

"डॉक्टरला मास्कोतच घर आणि नोकरी आणि देशासाठी प्राणाची बाजी लावलेल्या त्याला, उद्याची पिढी घडविणाऱ्या त्याच्या सुनेला::.हे"[११] पृ. क्र.१०८

तेव्हा त्याला विलक्षण राग येतो. त्याला हा स्वतःचाच नव्हे तर युध्दात कामी आलेल्या लाखो सैनिकांचा हा अपमान आहे असे वाटते. तो ताडकन उभा राहतो आणि पोलिसांच्या जवळ जाऊन शिव्या घालतो. तेव्हा पोलीस अतिशय चिडतात आणि त्याला तेथून ढकलून देतात. तेव्हा तो निराश होऊन मागे फिरतो या कथेत दुसऱ्या महायुध्दातील परिस्थितीचे व परदेशातील राजकीय वातावरणाचे दर्शन लेखकांनी घडविले आहे.

## 'पैसाची पोकळी '

ही सन १९९४ रोजी 'मराठवाडा' दिवाळी अंकातून प्रसिध्द झालेली कथा आहे.

या कथेत सरोजाबाईंना वृध्दत्वामुळे आलेले एकाकीपण आणि पणतू झाल्याची बातमी समजताच संपलेला अंतराय यातून तिचे आणि भोवतालच्या जगाचं नातं व त्यातला काळ यांचे दर्शन वसंत फेणे यांनी घडविले आहे.

या कथेतील नायिका 'सरोजाबाई' हिचा पती निवास याचा अकस्मात मृत्यू झालेला असतो. तिला अंजू नावाची एकच मुलगी असते. त्या अंजूची मुलगी मिनू ही गरोदर असते.

त्या मायलेकी दोघीही अमेरिकेत राहत असतात. मिनूचे बाळंतपण जवळ आल्याने सरोजाबाईना काळजी वाटत असते.

तिची मुलगी व नात अमेरिकेत असल्याने आणि ती इकडे एकटी असल्याने तिला सतत आपला नवरा निवास याची आठवण येत असते. त्यामुळे ती सतत नवऱ्याच्या हितगुजात रमलेली असत ती एकाकी होऊन मनातल्या मनात नवऱ्याशी हितगूज करताना म्हणते.

" आता पतवंड यायचं तुझं ! त्याचं सुखरुप आगमन होऊ दे. मग ने मला. किती दिवस ठेवतोस मला इथं दहा वर्षे भरत आली. अंजूच्या मुलीचं लग्न पाहा असं म्हणाला होतास. ते लग्न पाहीलं. आणि आता लग्नानंतर अडीच वर्षांनी तिला होणारं मूल पाहायला थोपवलस मला."[१२] पृ. क्र. ११३,११४.

अशा हितगुजामध्ये ती पैसाची पोकळीची भावना कमी करण्याचा प्रयत्न करीत असते. एकदा ती गाढ झोपली असता फोनची घंटी वाजते व ती दचकून जागी होते. तेंव्हा अंजू तिला पणतू झाल्याची गोड बातमी देते. ती फोनवरुनच त्या नवजात अर्भकाचा 'हॅं, हॅं. हॉं, हॉं.' असा सातासमुद्रा पलीकडून आलेला हुंकार ऐकते. तो हुंकार तिला शेवटच्या घटकेला निवासने काढलेल्या आवाजासारखा असल्याचे आठवते. तेव्हा ती आनंदोत्सवाने भारावून जाते. तो तिला आनंदोत्सव पैसाची पोकळी भरुन काढण्यासाठी आल्याचे जाणवते.

## 'शोध आणि बोध '

ही सन १९९९ मध्ये 'मेनका' या दिवाळी अंकातून प्रसिध्द झालेली कथा आहे. या कथेतील निवेदक हा एक उदयोन्मुख लेखक असून त्याची सहकारी असलेली विद्याताई हिची ही कथा आहे. तिचा नवरा बाबूराव हा बाहेरख्याली वाया गेलेला असतो. लेखक यासंबंधी सर्व व्यक्तिंच्या मुलाखती घेऊन जो शोध घेतो त्याचे विवेचन वसंत फेणे यांनी या कथेत केले आहे.

हा लेखक एक शिक्षक असून, त्याच्याच स्टाफमध्ये शिक्षिका असलेल्या विद्याताईंच्या उखडलेल्या संसाराविषयी त्याला थोडीफार माहिती असते. त्यामुळे त्याला विद्याताईच्या जीवन कहाणीत रस वाटतो. तेव्हा तो या कहाणीचा शोध घेण्याचे ठरवतो. या संदर्भात तो विद्याताईंना भेटून तिच्याकडून माहिती प्राप्त करतो. तिचा थोरला भाऊ 'भाई' एस.टी.त नोकरीस असतो. तेथे त्याची बाबूरावांशी मैत्री होते. त्या मैत्रीतूनच त्यांची सोयरीक जमते. त्यातूनच विद्याताईचे बाबूरावाशी लग्न होते. पण काही कालावधीतच विद्याताईला बाबूरावचे शेवंताबाई नावाच्या स्त्रीशी अनैतिक संबंध असल्याचे समजते. तेव्हा ती पुण्याहून आपल्या भावास बोलावून घेते. त्यामुळे तिच्या भावात व बाबूरावात मोठा वाद होतो. त्यानंतर दोनचार दिवसातच बाबूराव डेपोतील पैसे चोरुन फरार होतो.

त्यानंतर लेखक अधिक माहिती मिळविण्यासाठी पुण्याला भाईस भेटण्यासाठी जातो. पण तेथे भाई त्याला काहीच अंदाज लागू देत नाही त्यामुळे लेखक निराश होऊन मागे फिरतो. काही दिवसानी लेखक, भाई व बाबूराव यांचा मित्र असलेल्या रामभाऊला भेटतो. तेव्हा रामभाऊनेच पहिल्यांदा बाबूराव व भाईला शेवंताबाईकडे नेल्याचे लेखकाला समजते. पण त्यानंतर ते दोघे आठवड्यातून एकदा दोनदा परस्पर जाऊ लागतात. त्यात बाबूराव एकदमच वाया जातो. हे विद्याताईला समजल्यानंतर ती ही त्याला टाळू लागते. त्याचबरोबर डेपोतील लोकही त्याला टाळू लागतात त्यामुळे निराश होऊन तो वाडीला दिवस कठंत असल्याचे लेखकाला समजते.

दोन चार दिवसांनी लेखक वाडीला जातो. तेंव्हा बाबूरावही लेखकाला चांगला प्रतिसाद देतो. तो लेखकाला सर्व हकीकत सांगतो. त्याने शेवंताबाई विषयीची अनैतिक संबंधाची माहिती विद्याताईला दिलेली असते. पण तिचा या गोष्टीवर विश्वास नसतो. पण काही दिवसांनी या गोष्टीची तिला खात्री पटते. त्यामुळे दोघांच्यात वाद निर्माण होतो. तेव्हा तो घरात न राहता डेपोतील पैसे चोरून गोव्याला जातो. तो त्या पैशाचा गैरवापर करत नाही. तो अनेक मंदिराना देणगी देऊन पैसे संपवून घरी परततो. पण विद्याताई त्याला अंगाला हातही लावू देत नाही. त्यामुळे तो निराश होऊन सरळ शेवंताबाईकडे जातो. तिला ही सर्व हकीकत

सांगतो तिलाही वाईट वाटते. ती त्याला पैसे नसले तरी येण्यास सांगते. तो काही दिवस ट्रकवर नोकरी करतो. ट्रकवर त्याचे कपडे खराब होत असल्याने तो शेवंताबाईकडे जाण्यास टाळतो. त्यानंतर तो ट्रकवरील नोकरी सोडून उपासक म्हणून नरसोबाच्या वाडीला जातो.

वर्षभराने तो स्वतःचीच परीक्षा घेण्यासाठी शेवंताबाईकडे जातो. तेव्हा शेवंताबाई लाडात येते आणि त्याला गळही घालते. तेंव्हा तो तिला खरे सांगताना म्हणतो, '' मला निट संसार करायचाय त्यासाठी बायकोने स्वतः मला बोलवायला पाहिजे तोपर्यंत व्रतस्थ राहून दत्तगुरुची उपासना करायचीय.''[१३] पृ.क्र. १४५

त्यावेळी मात्र शेवंताबाईच्या डोळ्यात पाणी येते. ती गहिवरल्या स्वरात 'देव तुमचे गाऱ्हाण ऐको. दत्तगुरु तुम्हाला पावोत' असे म्हणते. ही सर्व हकीकत बाबूरावकडून ऐकल्यानंतर लेखकाला शेवंताबाईला भेटावेसे वाटते. तेव्हा लेखक शेवंताबाईला भेटण्यासाठी कोल्हापूरला रवाना होतो. तेव्हा तेथे ती बाबूराव देव माणूस असल्याचे लेखकाला स्पष्ट सांगते. या सर्व पात्रांना भेटल्यावर हा बाहेरख्याली म्हणून बदनाम झालेला बाबूराव देव माणूस व अधिक माणुसकी व प्रामाणिक असल्याचे दिसून येते.

प्रस्तूत कथेतून कथाकाराला वाचकाला बोध करावयाचा आहे. परंतू त्यांनी जे प्रसंग निवडले ते योग्य वाटत नाहीत. भोगवादी जीवन जगून तो सरळ देवभक्तीकडे वळतो. पुन्हा पहिल्या स्त्रीकडे येतो. पुन्हा नरसोबाच्या वाडीला जातो. म्हणजे जमेल तसे देवभक्ती करणे व देव तुमचे कल्याण करो असे म्हणणे, असा मालमसाला प्रस्तूत कथेत आहे. यातून काही बोध होतो असे वाटत नाही.

## 'बरं का मुलांनो '

ही सन १९९९ मध्ये ' अनुराधा' या दिवाळी अंकातून प्रसिध्द झालेली कथा आहे.

या कथेत पंत नावाच्या भ्रष्ट माणसाच्या जीवनाचे आणि तरुण विधवेवर अतिप्रसंग केल्याचा खोटा आरोप आलेल्या कृष्णभट या निरपराध ब्राम्हणाच्या जीवनाची व्यथा या दोन जीवन कथा उत्कृष्टपणे वसंत फेणे यांनी रेखाटल्या आहेत .

या कथेतील पंत हे एक विलक्षण व्यक्तिमत्व आहे. त्याने नोकरीत असताना भ्रष्टमार्गाने पैसा मिळवून पन्हाळ्याला बंगला बांधलेला असतो. त्याच्या बंगल्यात दरवर्षी मध्यमवर्गीय मित्रमंडळी पिकनिकसाठी येत असत. तेव्हा पंत आणि ही मंडळी यांच्यात मद्याच्या घोटाबरोबर बैठक रंगत असत. या बैठकीत पंतानी दोन व्यक्तीच्या जीवन कथा मिसळलेल्या आहेत. एक पंताची स्वतःची कथा आणि दुसरी वाडीला भेटलेल्या कृष्णभटाची कथा हे दोघेही भ्रष्ट वर्तनाने संसारातून हद्दपार होऊन नरसोबाच्या वाडीला येऊन राहिलेले असतात.

पंत हा सरकारी कचेरीत नोकरीस असतो. त्या कचेरीत तो अफरातफर करतो. त्यामुळे त्याला तुरुंगवास होतो. तेव्हा त्याची पत्नी तुरुंगवास भोगलेल्या आपल्या बदफैली नवऱ्यास घरी घेण्यास साफ नकार देते. त्यामुळे तो वाडीला आलेला असतो. तसेच कृष्णभट हा एके दिवशी कुळाचार करुन शेतवाडीतून घरी परतत असताना त्याला कुलकर्ण्यांची विधवा सून व खालच्या जातीतील वाण्याचा मुलगा या दोघांचे लफडे दृष्टीस पडते. त्याने खरे काही सांगून बोंब करु नये म्हणून ती विधवा आपल्या सासऱ्याला कृष्णभटाने आपला हात धरल्याची खोटी बतावणी करते. तेव्हा कुलकर्णी चिडून कृष्णभटाच्या घरी येतो. तो कृष्णभटाच्या मुलग्याला कृष्णभट तुझ्याबरोबर राहिल्यास तुझी गावातील सर्व पौराहित्याची कामे बंद करण्याची धमकी देतो. त्यामुळे नाईलाजास्तव कृष्णभट घर सोडून वाडीला आलेला असतो.

पण वर्षभरातच पंताचा मेहुणा पंताला घरी घेऊन जातो. मग मात्र पंत सूड म्हणून पाप, भ्रष्टाचार करीत पैसे मिळवून सुखी राहतो तर कृष्णभट मात्र आपल्यावर झालेला अन्याय निमुटपणे भोगून वाडीत बेवारशाचं आयुष्य कठंत असतो. अशा या निरपराध कृष्णभटाची अवस्था पाहून पंताला अतिशय करुणा वाटते. तो आपल्या मृत्यूनंतर परमेश्वराला कृष्णभटाच्या वतीने प्रश्न विचारण्याचा निर्धार करताना म्हणतो,

" बाबा रे अनेक पातकं केलेल्या मला सुखात ठेऊन त्या अश्राप ब्राम्हणाला वेबारशाच मरण दिलस ? कोणी दिला तुला हा अधिकार"[१४] पृ. क्र. १७०. आणि त्याला

अतिशय वाईट वाटते. ही कथा पारंपारीक पद्धतीने निरपराध ब्राम्हणाचे श्रेष्ठत्व सिद्ध करुन त्यांच्याविषयी कारुण्य स्पष्ट करते.

अशाप्रकारे वसंत फेणे यांनी ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहातील कथांतून बदलत्या मानवी जीवनातील कोसळणाऱ्या मानवी मूल्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय जीवन आधुनिकतेकडे वळले आहे. त्यामुळे धर्माच्या, गुन्हेगारीच्या, बेकारीच्या, वसाहतवादाच्या अनेक समस्या वाढल्या आहेत. त्याचे अत्यंत परिणामकारक चित्रण या कथासंग्रहातून येताना दिसते.

**'निष्कर्ष '**

- प्रस्तूत प्रकरणात **''ज्याचा त्याचा क्रूस''** व **''पाणसावल्यांची वसाहत''** या कथासंग्रहातील कथांचे वाड्.मयीन मूल्यमापन केले आहे. प्रत्येक कथेचे आशय सांगून तिचे वैशिष्ट्ये स्पष्ट केले आहे.
- ''ज्याचा त्याचा क्रूस'' व ''पाणसावल्यांची वसाहत'' या कथासंग्रहाची 'आशय सुत्रे' वसंत नरहर फेणे यांच्या कथालेखनाचे विशेष म्हणून प्रत्ययास येते.
- या दोन्हीही कथासंग्रहाचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे त्या कथा दिवाळी अंकातून पहिल्यांदा प्रसिध्द झालेल्या आहेत.
- 'करविता धनी' मधून वसंत फेणे यांनी रहिमतबी व खुशरु यांच्या दारिद्रयाचे दर्शन घडविले आहे.
- 'प्रश्न चिमूटभर' या कथेमधून डॉक्टरच्या वैफल्याचे चित्रण करुन आदर्शवाद व वास्तवजीवन यातील अचूक अंतर लेखकांनी टिपले आहे.
- 'नरनारायण' या कथेत लेखकांनी या कथेतील नायक वामन याच्या रुपाने मानवी मनाच्या त्रिशंकू अवस्थेचे दर्शन घडविले आहे.
- 'आकाशपुष्प' या कथेमध्ये वेड्याच्या जीवनाचे व मुलाच्या वेडाचारामुळे आई वडिलांना जो त्रास होतो त्याचे चित्रण वसंत फेणे यांनी केले आहे.

- 'धर्मसंकट' या कथेत राजकीय वातावरणाचे चित्रण करुन कट्टर धर्मवादामुळे सामान्य माणसाला जगणे कसे असह्य होते याचे दर्शन घडविले आहे.
- 'ज्याचा त्याचा क्रूस' या कथेत लेखकांनी परदेशातील वातावरणाचे व राजकीय ताणतणावाचे दर्शन घडवून, कृष्णवर्णीयांच्या उत्कर्षासाठी झोकून दिलेल्या एका श्वेतवर्णीय नॉरमन डी प्रॉक्ट यांच्या मनातील भावभावनांचे व दुःखाचे चित्रण केले आहे.
- 'अनाकलनीय' या कथेमध्ये वसंत फेणे यांनी वृध्दांच्या व्यथा, यातना व समस्या यावर प्रकाश टाकला आहे.
- 'नवी सद्दी येता येता' या कथेमध्ये लेखकांनी महानगरीय जीवनाचे चित्रण करुन भाईगिरीचे व राजकीय वातावरणाचे दर्शन घडविले आहे.
- 'मागे परतोनी पाहे' या कथेत लेखकांनी नात्यांच्या बंधनाना नकार देणाऱ्या, रुपाच्या मनातील भावभावनाचे दर्शन घडविले आहे.
- 'अल्याड-पल्याड' मध्ये माणूस स्वार्थासाठी रक्ताच्या नात्याला कसे विसरतो ? याचा प्रत्यय येतो.
- 'कल्पांतकालीन काही क्षण' या कथेत दमित्री या वृध्दाची कैफियत रेखाटली असून त्यात दुसऱ्या महायुध्दाचे व परदेशातील राजकीय वातावरणाचे दर्शन लेखकांनी घडविले आहे.
- 'पैसाची पोकळी' या कथेत वृध्दांच्या एकटेपणाच्या जाणिवेचे दर्शन घडते.
- 'शोध आणि बोध' या कथेत बाहेरख्याली वाया गेलेल्या माणसाजवळ कितीही माणुसकी व प्रामाणिकपणा असला तरीही त्याला लोक टाळतात याचा प्रत्यय येतो. ही कथा फारसा वाचकांना बोध देत नाही. कथेतील बदफैली नायकाकडून समाज काय बोध घेणार! समाज त्याला त्याच पध्दतीने वागवितो.
- 'बरं का मुलांनो' या कथेत भ्रष्ट व प्रामाणिक माणसाच्या कथा एकमेकांत गुंफलेल्या असून त्यात भ्रष्ट माणूस सुखी जीवन जगतो. तर प्रामाणिक माणसाला बेवारशाचं

जीवन येते. हे आशय सुत्र ठेवून लेखकांनी ही कथा रेखाटली आहे. परंतू शेवटी भ्रष्ट ते भ्रष्ट व सृष्ट माणसास चांगले दिवस येतात. हे या कथेतून दिसून येते.

- "ज्याचा त्याचा क्रूस" आणि पाणसावल्यांची वसाहत" या दोन्ही कथासंग्रहाच्या आधारे वरील निष्कर्षाची मांडणी केली आहे.

# प्रकरण तिसरे

# संदर्भ -सुची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | फेणे वसंत नरहर | : | 'ज्याचा त्याचा क्रूस'<br>मॅजेस्टिक प्रकाशन, ३१६, प्रसाद चेंबर्स,<br>गिरगांव, मुंबई-४, प्र. आ. १९९५, पृ. क्र.१९ |
| २) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक ५० |
| ३) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक ७४ |
| ४) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक ९४ |
| ५) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक १०४ |
| ६) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक १४५ |
| ७) | फेणे वसंत नरहर | : | 'पाणसावल्यांची वसाहत'<br>स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद,<br>प्र. आ. १ मे २००१ पृ. क्र. १५ |
| ८) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक ४९ |
| ९) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक ६४ |
| १०) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक ८६ |
| ११) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक १०८ |
| १२) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक ११३, ११४ |
| १३) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक १४५ |
| १४) | तत्रैव | : | पृष्ठ क्रमांक १७० |

# नियतकालिके (पूर्वप्रसिध्दी)

## "ज्याचा त्याचा क्रूस"

| | | | |
|---|---|---|---|
| १) | करविता धनी | : | 'अनुराधा', दिवाळी १९८९ |
| २) | प्रश्न चिमूटभरच | : | 'मराठवाडा', दिवाळी १९९१ |
| ३) | नरनारायण | : | 'केसरी', दिवाळी १९८९ |
| ४) | आकाशपुष्प | : | 'मराठवाडा', दिवाळी १९९३ |
| ५) | धर्मसंकट | : | 'प्रतिष्ठान', दिवाळी १९९५ |
| ६) | ज्याचा त्याचा क्रूस | : | 'सावाना' दिवाळी १९९३ |
| ७) | अनाकलनीय | : | 'मराठवाडा', दिवाळी १९९० |

## "पाणसावल्यांची वसाहत"

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नवी सद्‌दी येता येता | : | 'महाराष्ट्र टाईम्स' वार्षिक १९९९ |
| २) | मागे परतोनी पाहे | : | 'स्त्रग्धरा' दिवाळी १९९९ |
| ३) | अल्याड-पल्याड | : | 'कार्तिक' दिवाळी १९९९ |
| ४) | कल्पांतकालीन काही क्षण | : | 'साधना' दिवाळी १९९९ |
| ५) | पैसाची पोकळी | : | 'मराठवाडा' दिवाळी १९९४ |
| ६) | शोध आणि बोध | : | 'मेनका' दिवाळी १९९९ |
| ७) | बरं का मुलांनो | : | 'अनुराधा' दिवाळी १९९९ |